PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Mumbaicha Dabbewala
Year: 2007

Song: Chandnachya Patavar
Lyricist: Dada Kondke

चंदनाच्या ओ हो ओ हो ओ हो
चंदनाच्या ओ हो ओ हो ओ हो
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास तुला भरविते रे राया
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते
तुला पाहून कळी
माझी लई खुलते
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते

चोळी अंगात तंग
माझ्या कशी बसली
भर ज्वानीनं सखया
मुसमुसली
रंग साडीचा सांग
माझा दिसतो कसा
पहिल्या रातीचा गालावर
छाप जसा
माझ्या डोळ्याची
बाहुली गं भिरभिरते
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते रे राया
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते

गोऱ्या दंडाला
बाजूबंद आवळतो
तुला नाही सख्या
तो मला जळवितो
काकणं सोन्याची
हातामध्ये बघ नटली
हिरव्या चुडया बिगर
त्याला शोभा कुठली
काही मला असं
खोटं खोटं झुलविते
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास तुला भरविते रे राया
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते

साज कोल्हापुरी
गळयामध्ये कसा झुलतो
जसा शंभूच्या
भुजेवर नाग डुलतो
नाग डुलतो नाग डुलतो

Literacy for a Billion

कमरपट्ट्याचं घुंगरू
का हसलं
त्यानं पाहिलं ते
मला नाही कधी दिसलं
अशी म्होरं म्होरं
तोऱ्यानं का मिरविते
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते रे राया
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी

मोत्याचा घास
तुला भरविते
तुला पाहून कळी
माझी लई खुलते
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते रे राया
चंदनाच्या पाटावरी
सोन्याच्या ताटामंदी
मोत्याचा घास
तुला भरविते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*